इस्लामपूर नगरपरिषद, जि. सांगली
प्रशासकीय ठराव

विषय – नगरपरिषद स्तरावरील प्रशासकीय कामकाजाकामी कार्यकारिणी समिती गठीत करणेबाबत.

==========

प्रस्तावना – नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका २०१६ नुसार इस्लामपूर नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया ही नोंव्हेंबर २०१६ मध्ये पार पडलेली आहे. त्यानुसार जानेवारी २०१७ मध्ये सदरच्या विद्यमान नगरपरिषद कौन्सिलचा कार्यकाल हा तेव्हापासून ०३ जानेवारी २०२२ पर्यंत ०५ वर्षांचा राहिलेला आहे. सद्यस्थितीमध्ये २०१६ मध्ये गठीत झालेल्या नगरपरिषदेची मुदत ०३ जानेवारी २०२२ मध्ये समाप्त झालेली असल्याने नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजासाठी नगरपरिषद स्तरावरील प्रशासकीय कामकाजाकामी कार्यकारिणी समिती गठीत करणेबाबत.

प्रस्ताव -- नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका २०१६ नुसार इस्लामपूर नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया ही नोंव्हेंबर २०१६ मध्ये पार पडलेनुसार जानेवारी २०१७ मध्ये गठीत करण्यात आलेल्या कौन्सिलची मुदत दिनांक ०३ जानेवारी २०२ रोजी समाप्त झालेली आहे. नगरपरिषद कार्यालयाकडील विविध विभागांच्या कामकाजामध्ये ठरावाची अत्यंत आवश्यकता असते. मात्र सद्यस्थितीमध्ये कोणत्याही नगरपरिषद कौन्सिल सभेचे आयोजन होणे शक्य नसल्याने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेशान्वये नगरपरिषद स्तरावरील कार्यकारिणी समिती गठीत करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे मा.महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्याबाबतच्या कार्यवाहीस प्रशासकीय ठरावान्वये मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी पुढील कार्यवाहीसाठी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक ०१(३१) **दिनांक** --०५।०३।२०२२

नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका २०१६ नुसार इस्लामपूर नगरपरिषदेच्या जानेवारी २०१७ मध्ये गठीत करण्यात आलेल्या विद्यमान नगरपरिषदेचा कार्यकाल हा दिनांक ०३ जानेवारी २०२२ रोजी समाप्त झालेला आहे.

नगरपरिषदेच्या विविध विभागांकडील कामकाज हे प्रामुख्याने कौन्सिल ठरावान्वये होत असते. मात्र सद्यस्थितीमध्ये नगरपरिषदेची मुदत समाप्त झालेली असल्याने नजीकच्या कालावधीमध्ये कोणत्याच सभेचे आयोजन होणार नाही. त्यामुळे नगरपरिषदेचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज चालण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये नगरपरिषदेचे प्रशासक म्हणून मुख्याधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून नगरपरिषद स्तरावरून दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या नियोजनासाठी खालीलप्रमाणे कार्यकारिणी समिती गठीत करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

०२

अ.क्र.	कार्यकारिणीतील अंतर्भूत विभाग प्रमुखाचे नांव	कार्यकारिणीतील अंतर्भूत विभागाचे नांव	पदनाम
०१	श्री.वैभव साबळे	प्रशासक तथा मुख्याधिकारी	अध्यक्ष
०२	श्री.सतिश दंडवते	प्र.उपमुख्याधिकारी	सदस्य सचिव
	श्री.सतिश दंडवते	कर विभाग प्रमुख	सदस्य
०३	श्री.रमेश पाटील	बांधकाम विभाग प्रमुख	सदस्य
०४	श्री.निखील भुरे	नगररचना विभाग प्रमुख	सदस्य
०५	श्री.अविनाश जाधव	पाणी पुरवठा विभाग प्रमुख	सदस्य
०६	श्री.अनिकेत हेंद्रे	आरोग्य विभाग प्रमुख	सदस्य
		विद्युत विभाग प्रमुख	सदस्य
०७	श्रीमती दिपाली चव्हाण	आस्थापना विभाग प्रमुख	सदस्य
०८	श्री.विजय टेके	लेखा विभाग प्रमुख	सदस्य
०९	श्री.विशाल गुरव	संगणक विभाग प्रमुख	सदस्य
१०	श्री.साहेबराव जाधव	वाहन / अग्निशमन विभाग प्रमुख	सदस्य
११	श्रीमती सुलोचना माळी	सभाकामकाज विभाग प्रमुख	सदस्य
		जन्म-मृत्यू विभाग प्रमुख	सदस्य
		महिला व बाल कल्याण विभाग प्रमुख	सदस्य
		दिव्यांग विभाग प्रमुख	सदस्य
१२	श्री.शांतीप्रसाद पुंदे	मालमत्ता विभाग प्रमुख	सदस्य
१३	श्री.विजय टेके	रेकॉर्ड / भांडार विभाग प्रमुख	सदस्य

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व आवश्यक त्या कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.वैभव विजय साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये मान्यता प्रदान करीत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय : इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील केंद्र शासनाच्या १४ व १५ व्या वित्त आयोगातून इस्लामपूर हद्दीतील दैनंदिन संपुर्ण नागरी घनकचरा व्यवस्थापन करणे अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण नागरी घनकचरा व्यवस्थापन करणे अंतर्गत घरगुती, वाणिज्य, शासकीय कार्यालये, शाळा वर्गिकृत घनकचरा संकलन इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण रस्ते सफाई इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण गटर सफाई इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण नागरी कचरा वाहतुक करणे इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण घनकचरा डेपो देखभाल, घनकचरा डेपोवरील यंत्रे चालविणे, JCB परिवेक्षन इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन सार्वजनिक शौचालय, मुता-या दिवसातुन दोन वेळा स्वच्छ करणे, औषध फवारणी, पावडर फवारणी, धूर फवारणी करणे ही सर्व कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे इ. कामाबाबतच्या सन २०२२ -२०२३ स्वच्छता ठेक्यास मान्यता मिळणेबाबत .

प्रस्तावना : इस्लामपूर नगरपरिषद ही ब वर्ग नगरपरिषद असून शहराची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येवर आधारित २०२१ सालची लोकसंख्या अंदाजे ८०४७४ इतकी आहे. त्याचे क्षेत्र ४०.४२ चौ.मी आहे. शहरामध्ये शैक्षणिक, वैद्यकिय, उच्च शिक्षण इत्यादी सेवा उपलब्ध असून हे शहर तालुक्याचे ठिकाण आहे. या शहराचा वाढता विस्तार पाहता दैनंदिन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वच्छता व इतर सुविधा देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर ठेक्यास मुदतवाढ घेणेत आलेली आहे.

प्रस्ताव : इस्लामपूर नगरपरिषदेने ५८ (२) खाली प्रस्ताव घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दि.०१/१०/२०२१ यांची मान्यता घेणेत आलेली आहे. सदरचा प्रस्ताव हा दि. २७/१२/२०२१ रोजीच्या विशेष सभेसमोर मंजुरीसाठी सादर करणेत आलेला होता. परंतु सदरची सभा रद्द झाली असलेने त्यास मान्यता मिळू शकली नाही. तरी सदरचा प्रस्ताव हा शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असून सदरचा प्रस्ताव घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रशासकीय आर्थिक मान्यतेसाठी सादर करणेत आले आहे. सदरची बाब तातडीची असलेने सदर कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सांगली यांचेकडील पत्र क्र. जा.क्र. चिशा/इस्लामपूर नप/तांमा/२४६४ दि.१५/१२/२०२१ अन्वये र. रु. ३,७४,०९,८५५/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ०१ दिनांक : ०४/०१/२०२२.

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून, १) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७/१२/२०२१.२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशसन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१. ३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि. २८/१२/२०२१ व ४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदशे क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण नागरी घनकचरा व्यवस्थापन करणे अंतर्गत घरगुती, वाणिज्य, शासकीय कार्यालये, शाळा वर्गिकृत घनकचरा संकलन इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण रस्ते सफाई इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण गटर सफाई इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण नागरी कचरा वाहतुक करणे इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपुर्ण घनकचरा डेपो देखभाल, घनकचरा डेपोवरील यंत्रे चालविणे, JCB परिवेक्षन इत्यादी कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन सार्वजनिक शौचालय, मुता-या दिवसातुन दोन वेळा स्वच्छ करणे, औषध फवारणी, पावडर फवारणी, धूर फवारणी करणे ही सर्व कामे नगरपरिषदेच्या आदेशानुसार करणे इ. कामे करणेस र.रु. ३,७४,०९,८५५/- इतकी रक्कम खर्च करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करीत आहे. तसेच या अनुषंगाने सदर कामाकरिता अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकिय मंजुरी घेणेची कार्यवाही करणे, निविदा व संविदा प्रक्रिया करणेस, कामानुसार बिल अदा करणे कामी पुढील कार्यवाही करण्यास मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय -- सेवा/स्वेच्छासेवानिवृत्त कर्मचा-यांच्या पात्र वारसांना लाड पागे समितीच्या शिफारसीचा लाभ देणेबाबत.

प्रस्तावना –

इस्लामपूर नगरपरिषद आस्थापनेवरील सेवा/स्वेच्छासेवानिवृत्त कर्मचारी यांच्या वारसांनी वारसा हक्काने नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदरच्या पात्र वारसांना शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार सेवेची संधी देणे आवश्यक आहे.

प्रस्ताव –

इस्लामपूर नगरपरिषद आस्थापनेवरील सेवा/स्वेच्छासेवानिवृत्त कर्मचारी हे नगरपरिषद आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर कार्यरत होते. ते नियत वयोमानानुसार सेवा/स्वेच्छासेवानिवृत्त झाले असून त्यांचे वारस यांना लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नगरपरिषद सेवेत घेणेबाबत अर्ज सादर केले असून त्याबाबत तपशील खालीलप्रमाणे,

अ. न.	सेवा / स्वेच्छा सेवानिवृत्त कर्मचा-याचे नाव	सेवा / स्वेच्छा सेवानिवृत्त दिनांक	वारसदाराचे नाव	अर्जाचा दिनांक	सेवा/स्वेच्छा सेवानिवृत्त कर्मचा-याशी नाते
१	श्री.विजय ज्ञानू कांबळे	३०/११/२०२०	श्री.प्रकाश विजय कांबळे	आवक क्र. १८९३३दि. ०२/१२/२०२०	मुलगा
२	श्री.अनिल नाना कांबळे	३०/०४/२०२१	श्री.अभिजित अनिल कांबळे	आवक क्र. ४१९६ दि. १२/०५/२०२१	मुलगा

नगरपालिका / महानगरपालिका मधील सफाई कामगारांना त्यांचे निवृत्तीनंतर / मृत्यूनंतर / स्वेच्छानिवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी अशी तरतूद खालील शासन निर्णयातील तरतुदींमध्ये आहे.

१)नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. संकीर्ण २२९२/१९९९/प्र.क्र १६४/९२/ नवि-६ मुंबई,३०/०६/१९९४

२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र नपप्रसं/२००५ /लाड कमिटी/ प्र.क्र ११५ (५)/२६ दि. २३/०९/२००५

३) मा.आयुक्त तथा संचालक नपप्रसं/२००५/लाड कमिटी/प्र.क्र ११५ /५/ का-२४ दि.१८/०३/२००८

४) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र सफाई२०११ /प्र.क्र.३२०/ नवि २ मुंबई दि. २०/१०/२०११

५) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई शा.प.क्र. सफाई- २०१४ / प्र.क्र ०७ /महामंडळे, दि. २६फेब्रुवारी २०१४

६) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई शा.नि.क्र. सफाई- २०१५ / प्र.क्र २६८ /महामंडळे, दि.१० नोव्हेंबर २०१५

७) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई शा.नि.क्र. सफाई- २०१५ / प्र.क्र २६८ /महामंडळे,दि.११ मार्च २०१६

८) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई शा.नि.क्र. सफाई- २०१७ / प्र.क्र १३६/आरोग्य -३, दि ०७ डिसेंबर २०१७

Scanned with OKEN Scanner

9) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र. बीसीसी -२०१८ /प्र.क्र.२७/१६ –ब ९(सी),दि.१९ एप्रिल ,२०१८

वरील सर्व शासन निर्णयांतील तरतुदींनुसार लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नोकरी मिळणेकरीता अर्ज केलेले दोन्ही अर्जदार हे वारसा हक्काने नियुक्ती करण्यासाठी पात्र होत आहेत.

प्रशासकीय ठराव क्रमांक = ००२ दि.१३/०१/२०२२ --

इस्लामपूर नगरपरिषद आस्थापनेवरील सेवा/स्वेच्छासेवानिवृत्त कर्मचारी हे नगरपरिषद आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर कार्यरत होते ते नियत वयोमानानुसार सेवा/स्वेच्छासेवानिवृत्त झाले असून त्यांचे वारस यांनी लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नगरपरिषद सेवेत घेणेबाबत अर्ज सादर केलेनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. संकीर्ण २२९२/१९९९/ प्र.क्र.१६४/९२/नवि-६ दि. ३०जून १९९४व शासन निर्णय क्र सफाई-२०१५/प्र.क्र/२६८/महामंडळे, दि.१०नोव्हेंबर२०१५ अन्वये नगरपालिका / महानगरपालिका मधील सफाई कामगारांना त्यांचे निवृत्तीनंतर / मृत्यूनंतर / स्वेच्छानिवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते

वरील परिस्थितीत वारसा हक्कानुसार सेवेत सामाविष्ट करताना वारसदारांच्या पात्रतेचे खालील नियम लागू राहतील.

अ) वारस हक्कास पात्र व्यक्ती

1) पती / पत्नी
2) मुलगा – सून
3) अविवाहीत मुलगी
4) विधवा – घटस्फोटीत मुलगी
5) विधवा – घटस्फोटीत बहीण
6) वरील पैकी कोणही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैंकी सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबधित सफाई कामगारांचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणतीही नामनिर्देशित व्यक्ती.

वारसा हक्काने नियुक्ती करताना संबंधीत रिक्त होणारे पदावर वारसाची नेमणूक होत असलेने आस्थापना खर्चात वाढ होत नाही. त्यामुळे शासनाने सफाई कामगार नियुक्तीचे अनुषंगाने खर्चाची अट शिथील केली आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. नप्रसं २००५/लाड कमिटी/प्र.क्र.११५ (५)/२६ , दिनांक २३ मार्च २००६ मधील परिशिष्ट मधील मुद्दा क्रमांक १७ मध्ये परिपत्रक क्र नपप्रंस २००७/लाड कमिटी/प्रक्र.११५(५)/ का-२४ दि. ३ फेब्रुवारी २००७ नुसार बदल करण्यात आलेला असून सफाई कर्मचा-याच्या वारसास वारसा हक्काने नेमणूक मिळणेकामी १ वर्षात अर्ज करता येईल. सदर मुदतीनंतर अर्ज केल्यास अनुज्ञेय नाही. तसेच सफाई कर्मचा-याचा वारस अज्ञान असल्यास वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर वारसा हक्काने नेमणूक मिळणेसाठी अनुकंपा प्रमाणे १ वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक राहील असे आदेशित करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय क्र सफाई-२०१५/प्र.क्र/२६८/महामंडळे,दि.१०नोव्हेंबर२०१५ अन्वये मुद्दा क्र १ (ओ) अन्वये लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अंतर्गत वारसा हक्काच्या नियुक्तीची कार्यवाही सुरू असलेल्या प्रलंबित प्रकरणामध्ये (दि. २१ ऑक्टोबर २०११पूर्वीच्या) अर्ज करण्याची मुदत लागू राहणार नाही. मात्र नवीन प्रकरणांचा अर्ज करण्याची मुदत दि. २१ ऑक्टोबर २०११ नुसार सफाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त किंवा विकलांग झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाची राहील असा शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. तसेच मुद्दा क्र ३ अन्वये नियुक्तीसाठी अर्ज सादर केलेल्या <u>वारसाचे वय अर्ज केल्याच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.</u>

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र सफाई-२०१५/प्र.क्र/२६८/महामंडळे,दि.१०नोव्हेंबर२०१५ अन्वये मुद्दा क्र १ (क) नुसार वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तींपैकी कोणाही एकास निवृत्त / स्वेच्छा निवृत्त / वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगाराच्या किंवा कर्मचा-यांच्या शिफारशीनुसार नोकरी हक्क द्यावा, मात्र मृत कामगाराच्या किंवा कर्मचा-याच्या बाबतीत वरील अ मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे असे नमूद आहे. त्यानुसार श्री.विजय ज्ञानू कांबळे यांचा

Scanned with OKEN Scanner

अर्ज इकडे आवक क्र.१८९३३, दि.०२/१२/२०२० अन्वये श्री.प्रकाश विजय कांबळे यांस त्यांच्या रिक्त होणा-या जागी वारसा हक्काने नगरपरिषदेमध्ये नोकरी मिळणेबाबत नामनिर्देशित केलेले आहे. श्री.अनिल नाना कांबळे यांचा अर्ज इकडे आवक क्र. ४१९६, दि.१२/०५/२०२१ अन्वये श्री.अभिजित अनिल कांबळे यांस त्यांच्या रिक्त होणा-या जागी वारसा हक्काने नगरपरिषदेमध्ये नोकरी मिळणेबाबत नामनिर्देशित केलेले आहे. उपरोक्त नमूद शासन निर्णयातील निर्देशानुसार दोन्ही अर्जदार पात्र होत आहेत.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता श्री.विजय ज्ञानू कांबळे यांच्या पात्र वारसास म्हणजेच श्री.प्रकाश विजय कांबळे यास व श्री अनिल नाना कांबळे यांच्या पात्र वारसास म्हणजेच श्री.अभिजित अनिल कांबळे यास लाड पागे समितीच्या तरतूदीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार या पदावर सेवेत घेणेस या प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देत आहे.

उरण-इस्लामपूर नगरपरिषद जि.सांगली उरण-इस्लामपूर

(विभव सावळे)
मा.प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय इस्लामपूर नगरपरिषद पाणी पुरवठा योजनेकरीता सौर विद्युत संच आस्थापित करणेच्या कामाकरीता तांत्रिक सल्लागार नेमणेस मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावना इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील सुमारे १४,००० पाणी जोडणी करणेकरीता, १४ एमएलडी पाणी, बहे येथून कृष्णा नदी पात्रामधून उपसा करुन (बहे- इस्लामपूर ८ किमी अंतर), इस्लामपूर येथील जल शुद्धीकरण प्रकल्प येथे शुद्ध करुन शहरात ८ टाक्यांद्वारे पुरवठा केला जातो. बहे येथून पंपींग करणे, शुद्धीकरण करणे, पुन्हा वितरण टाक्यांमध्ये पंपींग करणे यासाठी चार नग एचटी विज जोडणीद्वारे विज पुरवठा केला जातो. त्यासाठी एकुण सरासरी मासिक विज बिल रु २५ लक्ष ते २८ लक्ष येत आहे.

प्रस्ताव सदर पाणी पुरवठा योजनेकरीता सौर विद्युत संच आस्थापित करुन त्यावर योजना चालवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, महाऊर्जा, एमएनआरई, एमएमईडीसीएल यांचे विविध योजनांनुसार अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचे वापरास चालना देणे हि योग्य होईल आहे. बहे येथील नगरपरिषदेची जागा, नगरपरिषद कार्यालय ते बहे- पाईपलाईन रोड, जलशुद्धीकरण केंद्र येथील जागा यांचा वापर करुन त्या ठिकाणी सौर विद्युत संच बसविणे शक्य होणार आहे.

नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या विज वापरानुसार आवश्यक सौर विद्युत संचाचे आराखडा तयार करणे, तांत्रिक नियोजन आराखडा, सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे, निविदा सूचना आणि निविदा, प्राप्त निविदांसाठी तांत्रिक मूल्यांकन अहवाल, आणि कार्यआदेशसाठी मसुदा सादर करणे, प्रकल्प उभारणी दरम्यान वेळोवेळी तपासणी करणे, उभारलेल्या प्रकल्पाची चाचणी करणे व अहवाल सादर करणे इत्यादी कामाकरीता शासन निर्णया नुसार अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमणे योग्य होणार आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ०३ **दिनांक : १७/०१/२०२२**

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून,

१) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७/१२/२०२१.

२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१.

३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि. २८/१२/२०२१ व

४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या विज वापरानुसार आवश्यक सौर विद्युत संचाचे आराखडा तयार करणे, तांत्रिक नियोजन आराखडा, सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे, निविदा सूचना आणि निविदा, प्राप्त निविदांसाठी तांत्रिक मूल्यांकन अहवाल, आणि कार्यआदेशसाठी मसुदा सादर करणे, प्रकल्प उभारणी दरम्यान वेळोवेळी तपासणी करणे, उभारलेल्या प्रकल्पाची चाचणी करणे व अहवाल सादर करणे इत्यादी कामाकरीता शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ दिनांक ०४/०६/२०१८ नुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार तत्वावर अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व जास्तीत जास्त १० लक्ष रुपये च्या मर्यादेस आर्थिक मान्यता प्रदान करीत आहे. तसेच या अनुषंगाने तांत्रिक सल्लागार नेमणेच्या कामाकरिता निविदा व संविदा प्रक्रिया करणेस, कामानुसार बिल अदा करणे कामी पुढील कार्यवाही करण्यास मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कोकस हॉटेल ते इस्लामपूर हायस्कूल (ताकारी रोड), कोकस हॉटेल ते पोलीस स्टेशन फाटा(ताकारी रोड), पेठ-सांगली रोड ते पद्मावतीनगर (कोल्हापूर रोड), दुर्गा हॉटेल ते राजेबागेश्वरपर्यंत(बहे रोड) यामधील अस्तित्वात असणा-या पाण्याच्या पाईप लाईन बदलणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील प्राप्त पत्राबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

==========

प्रस्तावना -

इस्लामपूर शहर हे 'ब' वर्ग नगरपरिषद असून हे शहर सांगली खालोखाल मोठे शहर असून औद्योगिक, शैक्षणिक व व्यवसायिक या सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणारे शहर आहे. या शहराचे मोठ्या प्रमाणावर नागरिकरण होत आहे. या वाढत्या लोकसंख्येला आवश्यक त्या सुविधा देण्याचा मोठा भार नगरपरिषदेवर येत आहे. तसेच नगरपरिषद हद्दीतील शहराला जोडणारे जे प्रमुख रस्ते आहेत. त्या रस्त्याचे रुंदीकरण वकॉक्रीटीकरण करणेचे काम हे सार्वजनिक बांधकाम उपविभाग इस्लामपूर यांचेमार्फत करणेचे चालू आहे. त्या रस्त्याच्या कामास अडथळा ठरणारी पाईप लाईन स्थलांतरित(बदलणे) करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव-

मा.सहाय्यक अभियंता(श्रेणी-१) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांचेकडील पत्र जा.क्र.सा.बां.उविइपूर/२११३/२०२१ दि.०१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर ते ताकारी रस्ता, इस्लामपूर ते बहे रस्ता, इस्लामपूर तेकामेरी रस्ता, इस्लामपूर ते कोल्हापूर रस्ता (वाघवाडी रोड) यामधील अस्तित्वात असणा-या पाण्याच्या पाईप लाईन बदलणे व रस्त्याच्या कामास अडथळा करणारे पाण्याची पाईप लाईन स्थलांतरीत करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखी कळविले आहे. सद्यःस्थितीत रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे सदर रस्त्याच्या पाईप लाईन तातडीने बदलणे आवश्यक आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम
१	कोकस हॉटेल ते इस्लामपूर हायस्कूल (ताकारी रोड) पर्यंत १०'' एच.डी. पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	१६,९०,२३४/-
२	कोकस हॉटेल ते पोलीस स्टेशन फाटा(ताकारी रोड) पर्यंत ४'' एच.डी.पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	६,२६,२४५/-
३	पेठ-सांगली रोड ते पद्मावतीनगर(कोल्हापूर रोड) पर्यंत ६'' व ४'' एच.डी. पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	७४,७७,३७८/-
४	दुर्गा हॉटेल ते राजेबागेश्वरपर्यंत(बहे रोड) पर्यंत ८'' एच.डी.पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	४६,४३,९३९/-
५	वाळवा बझार ते साखराळे रोड पर्यंत ८'' व ४'' एच.डी.पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	७०,१७,७०७/-

Scanned with OKEN Scanner

सदरची कामे १४ वा वित्त आयोगमूलभूत अनुदान (कार्यात्मक अनुदान), १५ व्या वित्त आयोग, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(महाअभियान) जिल्हास्तर, वैशिष्टयपूर्ण योजना व अन्य अनुज्ञेय योजनांचे अनुदानामधून करता येतील त्याकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ०४ **दिनांक-**१९/०१ / २०२२

उपरोक्त सर्व सविस्तर प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव विजय साबळे प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कामाचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम
१	कोकस हॉटेल ते इस्लामपूर हायस्कूल (ताकारी रोड) पर्यंत १०'' एच.डी. पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	१६,९०,२३४/-
२	कोकस हॉटेल ते पोलीस स्टेशन फाटा(ताकारी रोड) पर्यंत ४'' एच.डी.पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	६,२६,२४५/-
३	पेठ-सांगली रोड ते पद्मावतीनगर(कोल्हापूर रोड) पर्यंत ६'' व ४'' एच.डी. पी.ई.पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	७४,७७,३७८/-
४	दुर्गा हॉटेल ते राजेबागेश्वरपर्यंत(बहे रोड) पर्यंत ८'' एच.डी.पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	४६,४३,९३९/-
५	वाळवा बझार ते साखराळे रोड पर्यंत ८'' व ४'' एच.डी.पी.ई. पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे.	७०,१७,७०७/-

सदरची कामे १४ वा वित्त आयोगमूलभूत अनुदान (कार्यात्मक अनुदान), १५ व्या वित्त आयोग, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(महाअभियान) जिल्हास्तर, वैशिष्टयपूर्ण योजना व अन्य अनुज्ञेय योजनांचे अनुदानामधून करण्यात यावीत.

उपरोक्त कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमांना मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सांगली यांची तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय मंजूरीसाठी आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्यात यावा. प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेनंतर काम करून घेणेकामी जाहीर ई-निविदा सुचनेव्दारे निविदा मागविणेत याव्यात सदरची कामे पूर्ण करुन घेणेस येणा-या सर्व खर्चास या ठरावाव्दारे मंजूरी प्रदान करणेत येत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय - इस्लामपूर नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्र येथील इमारतीवरती रेकॉर्ड रूम बांधणे.

==========

प्रस्तावना -

इस्लामपूर नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्र येथील इमारतीवरती रेकॉर्ड रूम बांधणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्र येथील इमारतीवरील टेरिसमध्ये पावसाळ्यामध्ये पाणी साचत सदर स्लॅब काही ठिकाणी गळत असल्यामुळे त्याठिकाणी इमारतीच्या स्लॅबवर नवीन पञ्याचे शेड करून पावसाळ्यामध्ये स्लॅबमधून होणारे लिकेज कमी करणे आवश्यक आहे.

सदर नागरी सुविधा केंद्राच्या आस्तित्वातील जुन्या इमारतीवर जिन्यासह नवीन पहिल्या मजल्याचे बांधकाम केल्यास सदर पहिल्या मजल्याची जागा सुध्दा कार्यालयीन वापराकरिता रेकॉर्ड रूमकरिता वापरता येणारी आहे. तथापि, सदर ठिकाणी पहिल्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी अंदाजे १५.०० लाख खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे याबाबत सविस्तर चर्चा होवून निधीच्या अनुपलब्धतेमुळे सदर ठिकाणच्या नागरी सुविधा केंद्रावरील स्लॅबची गळती थांबविण्यासाठी व चालू पावसाळ्यात सदर स्लॅबच्या गळतीमुळे नागरी सुविधा केंद्राचा वापर करणेस अडचण निर्माण झाली आहे. तसेच नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या स्वरूपात पॅरापेट लेव्हलच्या ठिकाणी स्लॅबवर पञ्याचे अच्छादन करून पावसाच्या पाण्याची गळती थांबविण्यात यावी. त्याकरिता करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदरकामी रक्कम रू.४,७७,३२९/- (अक्षरी चार लाख सत्याहत्तर हजार तीनशे एकोणतीस रूपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम नगरपरिषद निधीतून करणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे सदर काम करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरीकरिता प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

५ / २९/०९/२०२२

प्रशासकीय ठराव क्र. - ०५ दिनांक - २९/०९/२०२२

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव विजय साबळे प्रशासक, वरील अहवालाचे अवलोकन करून इस्लामपूर नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्र येथील इमारतीवरील टेरिसवर पावसाळ्यामध्ये पाणी साचत सदर स्लॅब काही ठिकाणी गळत असल्यामुळे त्याठिकाणी इमारतीच्या स्लॅबवर नवीन पञ्याचे शेड करून पावसाळ्यामध्ये स्लॅबमधून होणारे लिकेज कमी करणे आवश्यक आहे.

सदर नागरी सुविधा केंद्राच्या आस्तित्वातील जुन्या इमारतीवर जिन्यासह नवीन पहिल्या मजल्याचे बांधकाम केल्यास सदर पहिल्या मजल्याची जागा सुध्दा कार्यालयीन वापराकरिता रेकॉर्ड रूमकरिता वापरता येणारी आहे. तथापि, सदर ठिकाणी पहिल्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी अंदाजे १५.०० लाख खर्च अपेक्षित आहे. निधीच्या अनुपलब्धतेमुळे सदर ठिकाणच्या नागरी सुविधा केंद्रावरील स्लॅबची गळती थांबविण्यासाठी व चालू पावसाळ्यात सदर स्लॅबच्या गळतीमुळे नागरी सुविधा केंद्राचा वापर करणेस अडचण निर्माण झाली आहे. तसेच नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या स्वरूपात पॅरापेट लेव्हलच्या ठिकाणी स्लॅबवर पञ्याचे

Scanned with OKEN Scanner

अच्छादन करून पावसाच्या पाण्याची गळती थांबविण्यात यावी. त्याकरिता करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदरकामी रक्कम रू.४,७७,३२९/- (अक्षरी चार लाख सत्याहत्तर हजार तीनशे एकोणतीस रूपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम नगरपरिषद निधीतून करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार सदर कामास या ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेत येत आहे.

(वैभव सावळे)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, जि. सांगली

प्रशासकीय ठराव क्र. 06 दि. 25/01/2022

विषयः- BPMS प्रणाली अंतर्गत तांत्रिक मनुष्यबळ मिळणेबाबत.

(BPMS) प्रणाली अंतर्गत महाआयटीव्दारे पुरवण्यात येणा-या तांत्रिक मनुष्यबळाच्या पुरवठयाबाबत पत्र क्र. नपप्रस/कार्या.08/ई-गव्हर्न्स/2021/BPMS/मनुष्यबळ/4032, दिनांक 18/11/2021 रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषद येथे कार्यरत असलेले सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर हे मनुष्यबळ दिनांक 31/12/2021 पर्यंत कार्यरत असतील व त्यानंतर दिनांक 01 जानेवारी 2022 पासून जिल्हास्तरावर 2 सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर (SSE) कार्यरत राहतील व दिनांक 01 एप्रिल 2022 पासून जिल्हास्तरावर 1 सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर (SSE) कार्यरत राहतील व संपूर्ण जिल्हयातील BPMS प्रणालीबाबत नगरपरिषदा / नगरपंचायती यांना येणा-या अडचणी दूर करतील याबाबत आपले कार्यालयास कळविणेत आलेले आहे, त्या अनुषंगाने सर्व साग्रकाम व कार्यालयीन टिपण्णी यांचे अवलोकन करणेत आले.

मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील दिनांक 23/12/2021 रोजीच्या पत्रान्वये दिनांक 15/11/2021 रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने, ज्या नगरपरिषद/नगरपंचायती यांनी आपल्या स्तरावरुन यांना सिस्टिम सपोर्ट इंजिनिअर (SSE) मनुष्यबळाची आवश्यकता आहे. अशा नगरपरिषद/नगरपंचायती यांनी आपल्या स्तरावरुन, नियमानुसार उचित निर्णय घेऊन सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर (SSE) मनुष्यबळ यांची सेवा उपलब्ध करुन घ्यावी. संचालनालयामार्फत दि. 01/01/2022 पासून कोणत्याही नगरपरिषद/नगरपंचायती मध्ये महाआयटीमार्फत पुरविण्यात येणारे मनुष्यबळ, (सिस्टीम स्पोर्ट इंजिनिअर) कार्यरत राहणार नाही व त्याबाबतचे देयक अदा करण्यात येणार नाही असे सूचित केलेले आहे.

तद् नंतर महाआयटी कंपनीने पत्र जा.क्र. Ref.no.MH-IT/OW/1221/02995, दिनांक 27/12/2021 रोजीने जर नगरपरिषद /नगरपंचायती यांना मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास या कंपनीव्दारे आपणासं मनुष्यबळ पुरविण्यात येईल असे कळविणेत आले होते.

तसेच यापूर्वी दिनांक दि. 17/12/2020 रोजीने मा. संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांना इस्लामपूर नगरपरिषद कार्यालयातील नगररचना विभागात रचना सहाय्यक ही 02 पदे रिक्त असून त्याची नियुक्ती करणेबाबत व सद्यस्थितीत सहाय्यक नगररचनाकार हे 01 पद मंजूर असून त्याप्रमाणे नगररचना विभागात श्री. निखिल अशोक भुरे हे कामकाज पाहत आहेत. इस्लामपूर नगरपरिषद ही पद "ब" वर्ग नगरपरिषद असून त्याप्रमाणे इकडील कामाचा व्याप ही मोठया प्रमाणात आहे असे कळविणेत आले आहे.सद्यस्थितीत बांधकाम परवाना, रेखांकन मंजूरी, गुंठेवारी विकास नियमाधीन, प्रधानमंत्री आवास योजना, STP प्रकल्प भूसंपादनाची कार्यवाही व झिरो पेंन्डसी दैंनदिन येणा-या अर्जाची निर्गती करणे असे कामकाज सुरु असलेने तसेच सदरची पदे रिक्त असलेने सहाय्यक नगरचनाकार यांचेवर अतिरिक्त भार पडत असलेने सदरची रचना सहाय्यक ही 02 रिक्त पदे भरणेबाबत कळविलेले आहे, परंतु अद्याप ही इस्लामपूर नगरपरिषदेमध्ये रचना सहाय्यक या 02 रिक्त पदांवर नियुक्ती झालेली नाही.

सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर (SSE) यांची दिनांक 18/11/2021 रोजीच्या व S2 Infotech Internationl Ltd. यांनी पाठविलेल्या पत्रान्वये दिनांक 31/12/2021 रोजी मुदत संपुष्टात आलेली असून नगरपरिषद स्तरावर सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर (SSE) हे मनुष्यबळाची कमतरता असलेने सिस्टीम सपोर्ट इंजिनिअर (SSE) हे मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने निविदा मागवणे, पेपर प्रसिध्दी करणे व त्या अनुषंगीक कामकाजाकामी आर्थिक व प्रशासकीय खर्चास या ठरावाव्दारे मान्यता देणेत येत आहे.

ठराव मंजूर

प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, जि. सांगली

प्रशासकीय ठराव क्र. 7 दि. 25/01/2022

विषयः- उरुण महसूल रि.स.नं. 459 व 465 (जुना रि.स.न. 965, 961) मधील 18 मीटर रुंदी असलेल्या रस्त्याचे 15 मीटर रुंदीचा रस्ता फेरबदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 37 नुसार कार्यवाहीबाबत..

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील उरुण महसूल रि.स.नं. 459 व 465 (जुना रि.स.न. 965, 961) मधील 18 मीटर रुंदी असलेल्या रस्त्याचे 15 मीटर रुंदीचा रस्ता फेरबदल करणेबाबत श्री. राहुल रतन पोरवाल वगैरे सर्व राहणार यांनी या कार्यालयाकडे दिनांक 14/01/2022 रोजीने अर्ज सादर केला आहे, त्यावरील सर्व साग्रकाम व कार्यालयीन टिपण्णी यांचे अवलोकन करणेत आले.

इस्लामपूर शहराचा मंजूर विकास आराखडा (दुसरी सुधारीत) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टिपीएस-1714/151/प्र.क्र./42/14/वि.यो.मंजूरी/नवि-13, दि. 14/08/2015 रोजी भागशः मंजूरी झालेली आहे. व शासन निर्णय क्र. टिपीएस-2014/696/प्र.क्र.166/14/नवि-13, दि. 27/07/2018 रोजी सारभूत स्वरुपाच्या फेरबदलांना अंतिम मंजूरी देणेत आलेली आहे.

सदर अंतिम विकास योजना (दुसरी सुधारीत) मधील अधिनियमान्वये केलेले सारभूत स्वरुपाच्या फेरबदल (SM व EP) चे अवलोकन केले असता, सदर 18 मीटर रुंदी असलेल्या रस्त्याच्या बाधीत रि.स.नं. 464, 465, 459, 455, 456 (जुना रि.स.नं. 960, 961, 965, 967,968) च्या सभोवती दर्शविण्यात आलेले /नियोजीत रस्ते खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	रस्त्याचे नांव	प्रस्तावीत रुंदी कलम 26 प्रमाणे	कलम (31) (1) नुसार झालेले फेरबदल मंजूर विकास योजना नकाशात दर्शविलेनुसार
1	MR-61 शिवपुरी ते कामेरी रस्ता 18 मीटर (दत्त टेकडीपर्यंत सर्व्हे नंबर 26 च्या हद्दीपर्यंत)	18 मीटर	EPR-7 - नुसार संपूर्ण रस्ता रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ट झालेला आहे.
2	MR-52 जुना कामेरी ते कामेरी रस्ता (सर्व्हे नंबर 933 ते सर्व्हे नंबर 927 च्या हद्दीपर्यंत)	18 मीटर	SMR-46- 15 मीटर
3	MR-51 क्रेशर चौक ते वाळवा फाटा	18 मीटर	EPR-5 -नुसार 12 मीटर
4	MR-31 (सर्व्हे नंबर 972 ते 955)	नियोजीत 18 मीटर रस्ता	नियोजीत 18 मीटर रस्ता
5	MR-44 कामेरी नाका (इस्लामपूर) ते कामेरी गावाच्या हद्दीपर्यंत (सर्व्हे 956 पर्यंत हद्दीलगत)	24 मीटर	24 मीटर

Scanned with OKEN Scanner

6	MR-50 आष्टा नाका इस्लामपूर ते जुना कामेरी रस्ता (सर्व्हे नंबर .944 पर्यंत हद्दीलगत)	18 मीटर	18 मीटर
7	MR-59 इस्लामपूर 30 मीटर रुंदीचा नियोजीत रस्ता	30 मीटर	30 मीटर
8	MR-65 (कामेरी ते जुना कामेरी रस्ता)	15 मीटर	15 मीटर

वरील तक्त्यातील अ.क्र 1 ते 8 मधील महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 31 (1) प्रमाणे मंजूर नियोजीत रस्त्याचे विश्लेषण केल्यास असे निदर्शनास येते की, सदर अर्जदार यांचे 18 मीटर रुंदी असलेल्या रस्त्याने बाधीत मिळकतीच्या पश्चिमेस (अ.क्र. 01 मध्ये - 18 मीटर रुंदीचा शिवपुरी रस्ता ते कामेरी रस्ता) 18 मीटर रस्त्यास जुळलेला असताना EPR-7 -प्रमाणे रद्द झालेला असुन सदरचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट झालेले आहे. तसेच अ.क्र. 2 मध्ये नमूद असलेला (MR-52) -रस्ता हा सदर बाधीत रस्त्याच्या पूर्वेस जुळलेला असून सदर रस्ता हा देखील 15 मीटर मंजूर आहे. तसेच सदर रस्त्यास समांतर लांबीचा अ.क्र. 8 मध्ये नमूद असलेला (MR-65) -15 मीटर रुंदीचा रस्ता मंजुर आहे.

अशी वस्तुस्थिती असताना MR-52 हा 15 मीटर रस्ता मंजूर असुन अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे मंजूर जुना कामेरी रस्ता ते कामेरी रस्ता 18 मीटर रस्ता हा देखील 15 मीटर झालेस सदर रस्त्याची सरंचना ही एकसमान होईल व सदरचे फेरबदल हे विकास आराखडयाचे स्वरुप बदलत नाही हे स्पष्ट दिसुन येत आहे. उक्त नमूद 18 मीटर रस्त्याचे रुंदीकरण कमी करुन 15 मीटर करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 प्रमाणे कार्यवाही करणेस या ठरावाव्दारे प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

ठराव मंजूर

प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद जि.सांगली.
प्रशासकीय ठराव

विषय - पाणी पुरवठा विभागाकडील बहे येथील जुने जॅकवेल येथील 160 के.व्ही.ए.चा ट्रान्सफॉर्मर रिवायडींग करणेबाबत.

प्रस्तावना - नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडील बहे येथील जुने जॅकवेल येथील 160 के.व्ही.ए.चा ट्रान्सफॉर्मर रिवायडींग करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव - नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडील बहे येथील जुने जॅकवेल येथील 160 के.व्ही.ए.चा ट्रान्सफॉर्मरची तपासणी केली असता, तो शॉर्ट सर्कीट हाऊस बंद पडलेला आहे.पाणी पुरवठा ही अत्यावश्यक बाब असल्याने सदरचा ट्रान्सफॉर्मर रिवायडींग करणे अत्यंत आवश्यक आहे. तरी त्याबाबतच्या कार्यवाहीस प्रशासकीय ठरावान्वये मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी पुढील कार्यवाहीसाठी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक 08 - दिनांक २५/०१/२०२२

नगरीपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडील बहे येथील जुने जॅकवेल येथील 160 के.व्ही.ए.चा ट्रान्सफॉर्मरची तपासणी केली असता तो शॉर्ट सर्कीट होऊन बंद पडलेला आहे. पाणी पुरवठा ही अत्यावश्यक बाब असल्याने सदरचा ट्रान्सफॉर्मर तातडीने दुरुस्त करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचे अंदाजपत्रक तयार करणेत यावेत. केलेल्या अंदाजपत्रकाच्या आधारे सदर कामाची निविदा काढणेत यावी.

तरी वरील प्रमाणे करावयाच्या सर्व आवश्यक त्या कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.वैभव विजय साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय : इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील लगून खड्डा येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प केंद्रावरील कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे (बायोमायनिंग करणे) च्या सन २०२२ -२०२३ कामाची दाखल निविदा मंजूर करणेबाबत...

प्रस्तावना : इस्लामपूर नगरपरिषद ही ब वर्ग नगरपरिषद असून शहराची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येवर आधारित २०२१ सालची लोकसंख्या अंदाजे ८०४७४ इतकी आहे. त्याचे क्षेत्र ४०.४२ चौ.मी आहे. या शहराचा वाढता विस्तार पाहता इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील लगून खड्डा येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प केंद्रावरीलकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे (बायोमायनिंग करणे) च्या सन २०२२ -२०२३ कामाची दाखल निविदा मंजुर करणे आवश्यक आहे. इस्लामपूर शहरात निर्माण होणारा कचरा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन केंद्र, लगून खड्डा, खेड रोड येथे साठविणेत आलेला आहे. मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३९ दि. १०/०६/२०१७ नुसार मे. TATA CONSULTING ENGINEERS LIMITED या संस्थेमार्फत करणेस घनकचरा व्यवस्थापनाचे सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणेत आलेली आहे.

प्रस्ताव : इस्लामपूर नगरपरिषदेने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३९ दि. १०/०६/२०१७ नुसार तांत्रिक मान्यतेसाठी मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली यांचेकडे इनपा/कार्या/०७/३३२५/२०२१ दि.१४/१२/२०२१ अन्वये प्रस्ताव पाठविणेत आलेला होता. सदर प्रस्तावास मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली यांचेकडून जा.क्र.चिशा/इस्लामपूर नप/तांमा/२४६५/२०२१ दि १५/१०/२०२१ अन्वये र. रु.७२,५८,२१७/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे. घनकचरा सविस्तर प्रकल्प अहवालानुसार र.रु ८४,६३,७६०/- चे काम करणेकरिता मा. जिल्हाधिकारी, यांचेकडील पत्र क्र. नवि/एसआर/५४/२०१८ जिल्हाधिकारी कार्यालय, सांगर्ल दि.२७/०७/२०१८नुसार प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे.

घनकचरा सविस्तर प्रकल्प अहवाल सन २०१७ नुसार ३७१३६.४ घनमीटर कच-याचे बायोमायनिंग करणेकरिता र. रु. ८४,६३,७६०/- मंजुर करणेत आले होते. तथापि सन २०१७ ते सन २०२१ या कालावधीमध्ये शहरातून गोळा होणारा कचरा देखील याच ठिकाणी साठविणेत आलेला आहे सन २०१७ पुर्वी प्रकल्पाच्या उत्तर बाजूकडील साठलेल्या कच-याचे दि. ०१/१०/२०२१ रोजी मोजमाप घेतले असता ते १६११३.२५७ घनमीटर आहे.

सविस्तर प्रकल्प अहवालानुसार मंजुर ८४,६३,७६०/- रक्कमेमधून सन २०१७ पुर्वीच्या साठलेल्या १६११३.२५७ कच-याचे बायोमायनिंग करणे योग्य आहे तसेच सन २०१७ नंतर साठलेल्या कच-याकरिता बायोमायनिंग करणेचे स्वतंत्र नियोजन करणे योग्य होईल.

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील लगून खड्डा येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प केंद्रावरील कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे (बायोमायनिंग करणे)कामाच्या र.रु. ७२,५८,२१७/- इतक्या अंदाजपत्रकीय कामाकरिता इकडिल इनपा/कार्या-०७/४२१२/२०२१ दि.१६/१२/२०२१ अन्वये दि. १८/१२/२०२१ रोजी जाहिर ई निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर ई निविदेअंतर्गत खालीलप्रमाणे ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

अ.क्र	मक्तेदाराचे नांव	दर
१.	ताराशंकर इन्फ्राकॉन प्रा.लि.	अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.०१०% कमी
२.	साईप्रो इन्फ्रास्ट्रकचर्स, पुणे.	अंदाजपत्रकीय रक्कमेइतकी
३.	पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल.	अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २.९९० टक्के जादा

प्रशासकीय ठराव क्रमांक : ०९ दिनांक : २७/०१/२०२२.

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून, १) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि २७/१२/२०२१.२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१. ३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि २८/१२/२०२१ व ४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदशे क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील लगून खड्डा येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प केंद्रावरील कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे (बायोमायनिंग करणे)कामाच्या र.रु. ७२,५८,२१७/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामाकरिता वरीलप्रमाणे पात्र ०३ निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ताराशंकर इन्फ्राकॉन प्रा.लि. अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.०१०% कमी दराची निविदा मंजुर करणेत येत आहे. ताराशंकर इन्फ्राकॉन प्रा.लि., यांना कामाचा कार्यादेश देणेत यावा व सदर कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३९ दि. १०/०६/२०१७ नुसार व मा. जिल्हाधिकारी, यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश पत्र क्र. नवि/एसआर/५४/२०१८ दि.२७/०७/२०१८ नुसार व शिल्लक मंजुर १४ व्या वित्त आयोगामधून करणेत यावा याकामी सर्व कार्यवाही करणेस व येणा-या खर्चास मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपारिषद, इस्लामपूर

विषय — इस्लामपूर नगरपरिषद पाणी पुरवठा योजनेकरीता सौर विद्युत संच आरथापित करणेच्या कामाकरीता तांत्रिक सल्लागार म्हणून एम टी कन्सल्टंन्सी प्रा. लि. यांना नेमणेस मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावना — नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या विज वापरानुसार आवश्यक सौर विद्युत संचाचे आराखडा तयार करणे, तांत्रिक नियोजन आराखडा, सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे, निविदा सूचना आणि निविदा, प्राप्त निविदांसाठी तांत्रिक मूल्यांकन अहवाल, आणि कार्यआदेशसाठी मसुदा सादर करणे, प्रकल्प उभारणी दरम्यान वेळोवेळी तपासणी करणे, उभारलेल्या प्रकल्पाची चाचणी करणे व अहवाल सादर करणे इत्यादी कामाकरीता शासन निर्णया नुसार अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमणे योग्य होणार आहे.

प्रस्ताव — सदर कामी करावयाच्या कार्यवाहीस मा. प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांची प्रशासकीय ठराव क्र. ०३ दिनांक १७/०१/२०२० नुसार मान्यता घेणेत आलेली आहे. सदर प्रशासकिय मान्यतेनुसार दै. जनप्रवास दिनांक १७/०१/२०२१ मध्ये सदर कामी जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदर जाहिर निविदेस अनुसरुन खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	दाखल दर /तांत्रिक सल्लागार शुल्क डीपीआर च्या टक्के
१	रेणुका इलेक्ट्रीकल्स	३ टक्के
२	एडब्लूएस टु पावर	२.५ टक्के
३	एम टी कन्सल्टंन्सी प्रा. लि.	२ टक्के

उपरोक्त कामाकरीता ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदां मधील कागदपत्रांची छाननी केली असता निविदेमधील अटी व शर्तीनुसार तीन निविदांच्या कागदपत्रांची पुर्तता होत असलेचे निदर्शनास येते. तरी एम टी कन्सल्टंन्सी प्रा. लि. यांची सर्वात कमी दराची म्हणजेच डीपीआर च्या २ टक्के दरानुसारची निविदा शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ दिनांक ०४/०६/२०१८ नुसार पात्र होत आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : १० **दिनांक : ०१/०२/२०२२**

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून,

१) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७/१२/२०२१.

२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१.

३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि. २८/१२/२०२१ व

४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, सर्वात कमी दर व तांत्रिक कामाचा अनुभव याची शहानिशा करुन, **एम टी कन्सल्टंन्सी प्रा. लि.** यांची नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या विज वापरानुसार आवश्यक सौर विद्युत संचाचे आराखडा तयार करणे, तांत्रिक नियोजन आराखडा, सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे, निविदा सूचना आणि निविदा, प्राप्त निविदांसाठी तांत्रिक मूल्यांकन अहवाल, आणि कार्यआदेशसाठी मसुदा सादर करणे, प्रकल्प उभारणी दरम्यान वेळोवेळी तपासणी करणे, उभारलेल्या प्रकल्पाची चाचणी करणे व अहवाल सादर करणे इत्यादी कामाकरीता अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व जास्तीत जास्त १० लक्ष रुपये च्या मर्यादेस आर्थिक मान्यता प्रदान करीत आहे. तसेच या अनुषंगाने तांत्रिक सल्लागार यांचेकडुन सौर विद्युत संच आस्थापित करणेच्या कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मान्यतेस्तव सादर करणे, प्रशासकिय मान्यतेस्तव सादर करणे कामी पुढील कार्यवाही करण्यास मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय : इस्लामपूर शहरातील मुख्य रस्त्यावरील संरक्षक भिंती ,नगर परिषद मालकीच्या सार्वजनिक मालमत्ता, शौचालये इत्यादी ठिकाणी भिंती रंगविणे, स्वच्छते विषयक स्लोगन लिहिणे, सचित्रे काढणे इत्यादी कामाबाबतचे दरपत्रक मागविणेबाबत...

प्रस्तावना : इस्लामपूर नगरपरिषदेने माझी वसुंधरा २.०, स्वच्छ सर्वेक्षण २०२२, ODF ++ या शासनामार्फत घेणेत येणा-या अभियानात सहभाग घेतलेला आहे. सदर अभियाना अंतर्गत IEC Acitivity साठी शहरातील मुख्य रस्त्यावरील संरक्षक भिंती, नगर परिषद मालकीच्या सार्वजनिक मालमत्ता, शौचालये इत्यादी ठिकाणी भिंती रंगविणे, स्वच्छतेविषयक स्लोगन लिहिणे, सचित्रे काढणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव : शासन निर्णय क्रमांक : स्वमअ — २०१९/ प्र.क्र.९४/नवि -३४, दि.२५ जुलै, २०१९, नपावै-२०१९/प्र.क्र.९४/नवि-१६ दि.२५ जुलै, २०१९, क्रमांक स्वमअ २०१९/प्र.क्र.९४/नवि - ३४. दि.१८ सप्टेंबर, २०१९, मधील तरतुदीनुसार इस्लामपूर शहरात IEC Acitivity अंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यावरील संरक्षक भिंती, नगर परिषद मालकीच्या सार्वजनिक मालमत्ता, शौचालये,इत्यादी ठिकाणी भिंती रंगविणे, स्वच्छतेविषयक स्लोगन लिहिणे,सचित्रे काढणे इत्यादी कामे करणे कामाकरीता नगरपरिषदेस प्राप्त असलेल्या बक्षीसाच्या अनुदाना मधून करणे योग्य होईल. तरी यास्तव दरपत्रक मागणी करुन दर मंजुर करुन सदरचे काम करणे योग्य होईल.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ११ दिनांक : ०१/०२/२०२२.

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून, १) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७/१२/२०२१.२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१. ३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि. २८/१२/२०२१ व ४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदशे क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर शहरातील मुख्य रस्त्यावरील संरक्षक भिंती ,नगर परिषद मालकीच्या सार्वजनिक मालमत्ता, शौचालये, इत्यादी ठिकाणी भिंती रंगविणे, स्वच्छते विषयक स्लोगन लिहिणे,सचित्रे काढणे इत्यादी कामे करणे करीता दरपत्रक मागविणे, कार्यादेश देणे, यासाठी प्रशासकीय मान्यता व रक्कम रु. १०,००,०००/- च्या मर्यादेस अधिन राहून वित्तीय मान्यता देणेत येत आहे. याकामी प्रशासकीय कार्यवाही करणेकरीता मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करीत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय : माझी वसुंधरा अभियानांतर्गत इस्लामपूर शहरातील E Waste Management अंतर्गत Mahalaxmi E Recyclers Pvt. Ltd. Pune यांचेसोबत करार करणे बाबत ...

प्रस्तावना : इस्लामपूर नगरपरिषदेने माझी वसुंधरा अभियान २.O मध्ये सहभाग घेतलेला आहे. सदर अभियानाअंतर्गत टुलकीट २०२१-२२ मधील १.२.६ मधील E Waste Management अंतर्गत E Waste (टेलिव्हिजन, फ्रीज, वाशिंग मशिन, संगणक व इतर electronic waste) चे recycling करीता E-waste खरेदी करून त्यावर प्रक्रिया करणारे संस्थेसोबत करारनामा करणे गरजेचे आहे.

प्रस्ताव : E Waste Management करणे पर्यावरणाच्या, माझी वसुंधरा अभियानासाठी व शहराच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता शहरामधील E Waste गोळा करणे, साठविणे व प्रक्रियेकरिता अनुभवी संस्थेकडे वर्ग करणे गरजेचे आहे. Mahalaxmi E Recyclers Pvt. Ltd. Pune ही संस्था E Waste Management मध्ये अनुभवी असलेने त्यांचेसोबत E Waste गोळा करणे, साठविणे, प्रक्रिया करणे या करिता ५ वर्ष कालावधीसाठी करारनामा करणे उचित राहील. करारनामा केलेस इस्लामपूर शहरातील E Waste बाबत शास्त्रोक्त प्रक्रिया करणे शक्य होईल.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ९२ **दिनांक :** ०१/०२/२०२२.

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून, १) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७/१२/२०२१.२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१. ३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि. २८/१२/२०२१ व ४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदशे क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषदेने माझी वसुंधरा अभियान २.O मध्ये सहभाग घेतलेला आहे. सदर अभियानाअंतर्गत टुलकीट २०२१-२२ मधील १.२.६ मधील E Waste Management अंतर्गत E Waste (टेलिव्हिजन, फ्रीज, वाशिंग मशिन, संगणक व इतर electronic waste) चे recycling करीता E-waste चे संकलन करून त्यावर प्रक्रिया करणारे संस्थेसोबत करारनामा करणे गरजेचे आहे. त्यास अनुसरुन Mahalaxmi E Recyclers Pvt. Ltd. Pune यांचे सोबत करारनामा करणेत यावा. तरी त्याचे सोबत करारनामा करणे करिता त्यांची MOU Fee रु ५००० + १८% GST = ५९०० अदा करणेस मान्यता देत आहे. याकामी प्रशासकीय कार्यवाही करणेकरिता मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय : माझी वसुंधरा अभियानांतर्गत इस्लामपूर शहरातील सर्व वृक्षांची जी.पी.एस यंत्रणेद्वारे वृक्षगणना करणे, Andriod Application खरेदी करणे, नगरपरिषदेच्या सार्वजनिक इमारतींचे एनर्जी ऑडिट व वॉटर ऑडिट करणे बाबत ...

प्रस्तावना : इस्लामपूर नगरपरिषदेने माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये सहभाग घेतलेला आहे. सदर अभियानाअंतर्गत टुलकीट २०२१-२२ मधील १.१.४ मधील हरित आच्छादन आणि जैव विविधता अंतर्गत इस्लामपूर शहरातील सर्व वृक्षांची जी.पी.एस यंत्रणेद्वारे वृक्षगणना करणेकरिता १०० गुण असलेने सदरची वृक्षगणना करणे अत्यंत गरजेचे आहे.

सदर अभियानाअंतर्गत टुलकीट २०२१-२२ मधील ४.२.४ उर्जा या घटका अंतर्गत नगरपरिषदेच्या सार्वजनिक इमारतींचे एनर्जी ऑडिट तसेच २.१ मधील वायू या घटका अंतर्गत नगरपरिषदेच्या सार्वजनिक इमारतींचे वॉटर ऑडिट करणे अत्यंत गरजेचे आहे. या दोन्ही कामांकरिता १०० गुण असलेने सदरचे एनर्जी व वॉटर ऑडिट करणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रस्ताव : हरित आच्छादन आणि जैव विविधता अंतर्गत इस्लामपूर शहरातील सर्व वृक्षांची जी.पी.एस यंत्रणेद्वारे वृक्षगणना करणे पर्यावरणाच्या, माझी वसुंधरा अभियानासाठी व शहराच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. इस्लामपूर शहरातील ४९४२१ इतक्या वृक्षांची वृक्षगणना ही सन २०१२ अखेर करणेत आलेली होती. त्यानंतर इस्लामपूर शहरामधील वृक्षांची वृक्षगणना झालेली करणेत आलेली नाही. तसेच इस्लामपूर नगरपरिषदेने वृक्ष लागवडी अंतर्गत सन २०१२ पासून आजअखेर लावणेत आलेल्या झाडांपैकी अंदाजे ५५००० इतकी झाडे जीवंत आहेत. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियक १९७५ (दि.०३/११/२००६ पर्यंत सुधारलेला) चे प्रकरण ४ कलम ७, ३ (ख) अन्वये ५ वर्षाहून एकदा नगरपालिका हद्दीतील सर्व जमिनीवरील विद्यमान झाडांची गणना करणे बंधनकारक आहे. तसेच इस्लामपूर शहरामधील ऊर्जा व पाणी बचत होणेकरिता नगरपरिषदेच्या सार्वजनिक इमारतींचे एनर्जी ऑडिट व वॉटर ऑडिट करणे गरजेचे आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : १३ दिनांक : ०३/०२/२०२२.

उपरोक्त सर्व सविस्तर नोंद घेणेत येवून, १) मा. प्रधान सचिव यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७/१२/२०२१.२) सह. आयुक्त नगरपरिषद प्रशासन पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. नपाप्र/नपा.१/कावि-१२५५/२०२१ दि.२८/१२/२०२१. ३) मा. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र. नवि/कार्या-१/नपं निवडणूक/६४९/२०२१ दि. २८/१२/२०२१ व ४) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदशे क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वैभव साबळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत खालील कामे करणेस प्रशासकीय मान्यता व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र	कामाचे नांव	टुलकिट क्र.	गुण
१.	इस्लामपूर शहरातील सर्व वृक्षांची जी.पी.एस यंत्रणेद्वारे वृक्षगणना करणेकरिता आवश्यक असलेले Andriod Application खरेदी करणे.	घटक १.१.४ हरित आच्छादन आणि जैव विविधता	१००
२.	इस्लामपूर शहरातील सर्व वृक्षांची जी.पी.एस यंत्रणेद्वारे वृक्षगणना करणे.		
३.	नगरपरिषदेच्या सार्वजनिक इमारतींचे वॉटर ऑडिट करणे.	घटक २.१ वायू	५०
४.	नगरपरिषदेच्या सार्वजनिक इमारतींचे एनर्जी ऑडिट करणे.	घटक ४.२.४ उर्जा	१००

याकामी प्रशासकीय कार्यवाही करणेकरिता मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना प्राधिकृत करत आहे.

(वैभव साबळे)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

